पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ११

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/११/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा वार बुधवार दिनांक – **१४/११/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.इंदलकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुलकर्णी, मा.खोंद्रे- कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) जागा आरक्षणाबाबत. – मा.डॉ.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) ठराव क्र.२७ दिनांक २४/१०/२०१८ मध्ये दुरुस्तीबाबत. – मा.कमल घोलप, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

**----------**

दिनांक २४/१०/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १४/११/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.कमल घोलप
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत..

विषय क्रमांक ०१ चा विचार दिनांक २६/१२/२०१८ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १४/११/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे स.नं.७३,७४,७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी.रस्त्याचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार दिनांक २६/१२/२०१८ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १४/११/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/२२४/२०१८, दि.१६/१०/२०१८

विषय : मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ मधील २४ मी.रस्ता रद्द करणेकरिता महाराष्ट्र शासन प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत...

विषय क्रमांक ०३ चा विचार दिनांक २६/१२/२०१८ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १४/११/२०१८

सुचक : मा.डॉ.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : मा.डॉ.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

पिंपरी येथील आरक्षण क्र.७१ स.नं.१०६ हे आरक्षण माध्यमिक विद्यालयासाठी आरक्षित असून पिंपरी येथील माध्यमिक शाळेची निकड पाहता सदर आरक्षणाची जागा त्वरीत भूसंपादन करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिकेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ०५

दिनांक - १४/११/२०१८

सुचक : मा.कमल घोलप अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा.कमल घोलप, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७ दि.२४/१०/२०१८ मध्ये "यशवंतराव चव्हाण झोपडपट्टीमध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सेवा सुविधा पुरविणेचे कामास" हा मजकूर वगळून त्या ऐवजी " यशवंतनगर झोपडपट्टीमध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सेवा सुविधा पुरविणेचे कामास " हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सीमा दत्तात्रय चौगुले)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७२९/२०१८
दिनांक : १४/११/२०१८

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.